पुणे जिल्हा परिषद, पुणे.
यशवंतराव चव्हाण भवन, वेलस्ली रोड, कॅम्प, पुणे – ४११ ००१.
शिक्षण विभाग (प्राथमिक)
Email- edupri.zppune@gmail.com | ssapune1@yahoo.co.in

# प्रथम मान्यता

जा.क्र.जि.प.शिक्षण/प्राथ/खाप्राशा1/09/2023/९४८ पुणे । दिनांक: 20/01/2023

प्रति,

अध्यक्ष/सचिव/मुख्याध्यापक,

विश्व प्रतिष्ठान इंदापुर 651,पंचवटी हाऊसिंग सोसायटी, एम.एस.ई.बी.समोर, ता इंदापूर, जि. पुणे पिन 413 106 संचालित जिजाऊ इन्स्टिटयुट ( 27250601404 ) कालठण, नं. १, ता. इंदापूर, जि. पुणे

विषय - सन 2022-23 या शैक्षणिक वर्षापासुन महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा(स्थापना व विनियमन)अधिनियम 2012 अंतर्गत स्वयंअर्थसहाय्यित तत्वावर नवीन शाळा स्थापना करणे,तसेच विद्यमान शाळेचा दर्जावाढ करण्यासाठी परवानगी देण्याबाबत..

संदर्भ - 1.शासन निर्णय क्र. एसएफएस-1014/प्र.क्र.170/एसएम-2/ दि. 02/06/2015 शालेय शिक्षण मंत्रालय, मुंबई
2.जा.क्र.शिउस/प्राथ-2/स्वयंअशाळा/मान्यता/पुवि/ 2015/15757/60 शिक्षण उपसंचालक पुणे विभाग दि 30/06/2015
3.शाळेचा प्रस्ताव दिनांक 14/11/2022
4.श्री. राजकुमार बामणे, गटशिक्षणाधिकारी, पंचायत समिती इंदापुर यांचेकडील तपासणी अहवाल 28/12/2022

वरील विषयी आपणास कळविण्यात येते की, आपल्या संस्थेने नवीन शाळा करण्याकरिता प्रस्ताव सादर केला होता. त्या प्रस्तावानुसार आपल्या संस्थेस संदर्भ क्र .1 ते 4 नुसार खालील अटी व शर्तीवर इयत्ता १ ली ते इयत्ता ८ वी साठी प्रथम मान्यता देण्यात येत आहे.

| अ.क्र. | संस्थेचे नाव व पुर्ण पत्ता | मान्यता मिळालेल्या शाळेचे नाव व पुर्ण पत्ता | माध्यम | शाळेचा प्रकार नवीन शाळा/ दर्जावाढ | मान्यता वर्ग / इयत्ता | मान्यता वर्ष |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | विश्व प्रतिष्ठान इदापुर 651,पंचवटी हाऊसिंग सोसायटी, एम.एस.ई.बी.समोर, ता. इंदापुर, जि. पुणे पिन 413 106 | जिजाऊ इन्स्टिटयुट ( 27250601404 ) कालठण, नं. १, ता. इंदापूर, जि. पुणे | इंग्रजी | नवीन शाळा स्वयंअर्थसहाय्यित | प्राथमिक ते उच्च माध्यमिक इयत्ता १ ली ते इयत्ता ८ वी | 2015-16 |

## अटी व शर्ती

1. मंजूर केलेले शिक्षणाचे माध्यम, शाळेचे ठिकाण इ.मध्ये भविष्यात शासनच्या परवानगीशिवाय कोणताही बदल करता येणार नाही.
2. शाळा व्यवस्थापनाने शासनाने मंजुरी दिलेल्या ठिकाणाव्यतिरिक्त अन्य ठिकाणी शाळा स्थापन केली असेल तर त्या शाळेची परवानगी रद्द होईल.
3. स्वयंअर्थ सहाय्यित शाळेतील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची भरती शासनच्या प्रचलित नियमानुसार व विनियामानुसार करण्यात यावी.
4. परवानगी मिळाल्यापासून अठरा महिन्याच्या आत वर्ग सुरु न केल्यास सदर परवानगी रद्दबातल ठरेल.
5. परवानगी देण्यात आलेल्या वर्ग शासनाच्या वेळोवेळी निर्गमित होणाऱ्या आदेशाचे, कार्यपध्दतीचे तसेच बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम 2009 व महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यितशाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम 2012 मधील सर्व तरतूदीचे पालन करणे बंधनकारक राहिल.
6. शाळा इमारतीच्या दर्शनी भागात सर्व जनतेच्या माहिती करिता स्वयंअर्थसहाय्यित तत्वावरील परवानगी प्राप्त वर्ग असे दर्शविणारा फलक लावणे बंधन कारक राहील.
7. महाराष्ट्र स्वयं अर्थसहाय्यितशाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम 2012 या अधिनियमाच्या अंतर्गत मान्यता दिलेल्या शाळांना भविष्यात अन्य ठिकाणी स्थलांतर करता येणार नाही.
8. शासन मान्यता पत्र क्र. शासन निर्णय क्र. एसएफएस-1014/प्र.क्र.170/एसएम-2/ दि. 02/06/2015 शालेय शिक्षण मंत्रालय, मुंबई मधील अटी शर्ती तील मुददा क्र. 1 ते 12 च्या पुर्ततेच्या अधिन राहुन मान्यता देणेत येत आहे.
9. महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन)अधिनियम 2012 याअधिनियमाच्या अंतर्गत परवानगी दिलेल्या शाळांना UDISE मध्ये माहिती भरताना स्वयंअर्थसहाय्यित शाळा म्हणून स्वतंत्र नोंद करणे आवश्यक राहील.
10. शासनाचे सध्या अस्तित्वात असलेले प्रचलित नियम व शासन वेळोवेळी विहीत करेल अशा नियमाची अंमलबजावणी करणे बंधनकारक राहील.
11. भविष्यात या शाळेची प्रथम मान्यता बाबत कोणत्याही स्वरुपाची तक्रार प्राप्त झाल्यास अथवा न्याय प्रविष्ठ प्रकरण उद्‌भवल्यास सदरचा प्रथम मान्यता आदेश रद्द करण्यांत येईल.

(संध्या गायकवाड)
शिक्षणाधिकारी(प्राथमिक)
पुणे जिल्हा परिषद,पुणे

प्रत - माहितीसाठी सविनय सादर-

1)मा.अवर सचिव,शालेय शिक्षण व क्रीडा विभाग,मंत्रालय,मुंबई-32.

2)मा.शिक्षण संचालक(माध्य.वउच्च माध्य.),शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,पुणे-1

3)मा.शिक्षण संचालक(प्राथमिक) शिक्षण संचालनालय महाराष्ट्र राज्य पुणे-1

Scanned with OKEN Scanner